MHPU240001612022

**<u>रे.मु.नं.२६/२०२२ मधील निशाणी क्र.१३ व १५ वरील संयुक्तीक आदेश</u>**

**१.** प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी प्रस्तूतचे अर्ज त्यांचे विरुध्द झालेला 'कैफियत नाही' चा झालेला आदेश रदद् करण्यासाठी तसेच त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील प्रतिवादी क्र. १ व ४ यांचे कथनानुसार, प्रतिवादी क्र. १ व ४ यांना दाव्याचे समन्स मिळालेले आहे परंतु कैफियत व जबाब देणेकामी आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे सदर प्रतिवादींना वेळेत मिळाली नाही. तसेच सदर प्रतिवादी हे वयस्कर व कमी शिकलेले असल्याने मुदतीत कैफियत व जबाब देवू शकले नाही. त्यामुळे न्यायालयाने त्यांचेविरुध्द दि.१८.०७.२०२२ रोजी 'कैफियत नाही' चा आदेश पारित केलेला आहे. त्यामुळे सदर प्रतिवादींविरुध्द झालेला 'कैफियत नाही' चा आदेश रदद् होवून, त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून, कैफियत अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास झालेला ८ महिन्यांचा विलंब माफ केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज नामंजुर झाल्यास सदर प्रतिवादींवर अन्याय होणार आहे. सबब, नैसर्गिक न्यायतत्वानुसार अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तूतच्या अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे देवून प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक नसून त्यांना कैफियत दाखल करण्यास किती दिवसांचा विलंब झाला हे नमुद केलेले नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींवर जास्तीत जास्त खर्च लादण्यात यावा अशी विनंती केली.

४. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तूतचा दावा हा अतिक्रमण काढून ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. १ व ४ यांना दाव्याचे समन्सची दि.०२.०२.२०२२ रोजी बजावणी होवून देखील त्यांनी मुदतीत दाव्याचे कामी हजर होवून कैफियत दाखल केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे माझे पुर्वअधिकारी यांनी त्यांचे विरुध्द 'कैफियत नाही' चा आदेश पारित केलेला दिसून येतो. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी सदरचे अर्ज दि.१९.०१.२०२३ रोजी दाखल केलेले असून अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यास ८ महिन्यांपेक्षा जास्त उशीर झालेला दिसतो. तसेच प्रतिवादी यांनी सदर अर्जातील कथनांचे सत्यतेकरीता निशाणी क्र. १४ व १६ अन्वये प्रतिवादी क्र. १ यांचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. अशा परिस्थितीत, प्रतिवादी क्र. १ व ४ यांची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट, प्रतिवादी क्र. १ व ४ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करण्यास मदत होणार आहे. तसेच वादींनी देखील प्रस्तुतचे अर्जास स्पष्ट हरकत घ ेतल्याचे दिसून येत नाही. शिवाय प्रस्तुत दावा हा अतिक्रमण क्षेत्र काढून ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादी नं. १ व ४ यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने त्यांचे प्रस्तुतचे अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ व ४ यांना आपली कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो खर्च त्यांचेवर आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१. प्रतिवादी क्र. १ व ४ यांचे प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. १३ व निशाणी क्र. १५ मंजूर करण्यात येतात.

२. प्रतिवादी नं. १ व ४ यांचे विरुध्द झालेला ‘कैफियत नाही’ चा आदेश एकत्रित रक्कम रू. ६००/— (अक्षरी रक्कम रुपये सहाशे मात्र) इतका खर्च वादीला देण्याच्या अटीवर रदद् करण्यात येतो. प्रतिवादी नं. १ व ४ यांनी दिलेली कैफियत, आदेशित खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

Digitally signed by MEGHA SHANKARRAO MALI
Date: 2023.09.25 16:28:06 +0530

घोडेगाव
दिनांक — २५.०९.२०२३

(एम. एस. माळी)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव